■ व्याख्यान : इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनीअर्स व तंत्रज्ञान विभाग शिवाजी विद्यापीठ यांच्यावतीने व्याख्यान, विषय : अभियांत्रिकी शिक्षणातील संधी, केंद्रीय प्रवेश प्रक्रिया, वक्ते : डॉ. जयदीप बागी, स्थळ : केशवराव भोसले नाट्यगृह, वेळ : स. ९.३० वा.

# ‘अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी’ या विषयावर आज व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) कोल्हापूर स्थानिक केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाच्या वतीने रविवारी (दि.२) ‘अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१९’ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. केशवराव भोसले नाट्यगृहात सकाळी ९.३० वाजता व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमात अभियांत्रिकीच्या विविध विद्या शाखांमधील संधीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. पी. व्ही. कडोले, डॉ. जयदीप बागी यांनी केले आहे.

My Kolhapur Edition
2 Jun, 2019 Page No. 3
Powered by : erelego.com

# सकारात्मकता, आत्मविश्वास, वेळेचे नियोजन हवे



डॉ. ए. एम. गुरव

**कोल्हापूर :** 'मुलाखत ही व्यक्तिमत्व विकासाची परीक्षा असते. त्या माध्यमातून शिक्षणासहित व्यक्तिमत्त्व उलगडत असते. आयुष्यात कुठल्याही प्रकारच्या मुलाखतीला सामोरे जाताना, सकारात्मक वृत्ती, वेळेचे नियोजन आणि मुलाखती दरम्यान उत्कृष्ट सादरीकरण या त्रिसूत्रीची सांगड घातल्यास नक्कीच यशस्वी ठराल,' असा मंत्र शिवाजी विद्यापीठातील कॉमर्स अँड मॅनेजमेंट डिपार्टमेंटचे विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी दिला.

'महाराष्ट्र टाइम्स' आणि 'टाइम्स ऑफ इंडिया'तर्फे आयोजित 'मटा एज्युफेस्ट २०१९'मध्ये ते बोलत होते. 'प्रशासकीय स्पर्धा परीक्षा व मुलाखतीचे तंत्र' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गुरव यांनी मुलाखतीला जाताना पुरुष व महिला उमेदवारांनी कोणता पेहराव करावा, संभाषण कौशल्य, केशरचना ते प्रत्यक्ष मुलाखत देताना घ्यावयाची काळजी यासंबंधी मार्गदर्शन केले.

डॉ. गुरव म्हणाले, 'करिअरच्या वेगवेगळ्या क्षेत्रात प्रत्येकाला मुलाखत प्रक्रियेला सामोरे जावे लागते. मुलाखतीचे प्रत्यक्ष मुलाखत (फेस टू फेस) आणि टेलिफोनिक असे दोन प्रकार आहेत. अभ्यासक्रमासाठी मुलाखत असो की नोकरीसाठी उमेदवारांनी काही संकेत पाळावेत. पूर्ण अभ्यास करून मुलाखतीला सामोरे जावे. मुलाखत देताना सकारात्मकता, आत्मविश्वास असावा. मुलाखतीच्या वेळे अगोदर तीस मिनिटे अगोदर संबंधित केंद्रावर उपस्थित राहा. भडक रंगाचा पेहराव करू नये. मुलाखत प्रक्रिया ही ३० मिनिटांपासून तीन दिवस चालणारी असते. या कालावधीत उमेदवारांनी कधीही मनामध्ये नकारात्मक विचार आणू नयेत. आत्मविश्वास ढळू देऊ नये, मुलाखतीद्वारे उमेदवाराचे व्यक्तिमत्त्वाची तपासणी होते.'